# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (महाराष्ट्र)

## पाहिजेत

## तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsman)

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करतांना मजुरांकडून व सर्वसामान्य जनतेकडून प्राप्त होणा-या तक्रारींची चौकशी करून उचित न्यायनिर्णय देणेसाठी गोंदिया जिल्हयातील रिक्त पदावर तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsman) यांची नेमणूक करावयाची आहे.

**किमान अर्हता:-**

1. उमेदवार शैक्षणीक अर्हताबाबत पुरावे जोडावे.
2. उमेदवारास लोकप्रशासन / विधी / सामाजिक कार्य / शैक्षणिक किंवा व्यवस्थापन क्षेत्रातील किमान दहा वर्षांचा अनुभव असावा. सामाजीक संस्था किंवा लोकासोबत काम केल्याचा अनुभव असल्याचा दाखला बंधनकारक आहे.
3. उमेदवार राजकीय पक्षाशी संबंधित नाही याबाबतचे प्रतिज्ञापत्र द्यावे.
4. शारीरिकदृष्ट्या सुदृढ तसेच जिल्यातील अतिदुर्गम भागात, दौरे निरीक्षण करण्यास सक्षम असावा.
5. उपरोक्त पदाची संपुर्ण माहिती जबाबदारी व कर्तव्य आदी तपशिल हा Gondia.nic.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
6. नामांकन सादर करतांना शैक्षणिक पात्रता, अनुभव व वय इ. दाखले त्याचप्रमाणे फिटनेस बाबत वैद्यकिय दाखला कोणताही गुन्हा नोंद नसल्याचे नोटरी केलेले प्रतिज्ञापत्र इ. प्रस्तावासोबत कागदपत्रे असणे आवश्यक आहे.
7. उमेदवार स्थानीक / शेजारच्या जिल्हयातील असल्यास तसा पुरावा जोडावा.

**कालावधी व मानधन :-**

1. या पदावरील नियुक्तीचा कार्यकाल दोन वर्षाकरीता असेल. तथापी, कामगीरी समाधानकारक नसल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल.
2. तक्रार निवारण प्राधिकारी यांना महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग यांचे पत्र क्र.मग्रारो-2022/प्र.क्र.118/रोहयो-6 अ दिनांक 30 सप्टेंबर, 2022 प्रती बैठक रू. 2250/- या दराने (कमाल रू. 45,000/- प्रतिमाह या मर्यादेत) मानधन देण्यात येईल.
3. त्यांचे कार्यालय संबंधित जिल्हयाचे मुख्यालयाच्या ठिकाणी असेल.
4. तक्रार निवारण प्राधिकारी यांची नियुक्ती जास्तीत जास्त 4 वर्ष किंवा वयाचे 68 वर्षापर्यंत राहील.

अर्जाचा नमुना हा रोहयो कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे उपलब्ध आहे. इच्छुक उमेदवारांनी स्वत:ची शैक्षणिक अर्हता व अनुभवासंबंधीच्या प्रमाणपत्रासह परिपुर्ण भरलेले अर्ज खाली नमुद केलेल्या मुदतीत जिल्हाधिकारी कार्यालयातील रोहयो कक्ष येथे दि. 13 / 04 /2023 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत व्यक्तीश:/टपाल/स्पीडपोस्ट अथवा कुरीअरमार्फत पाठवावे. मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. या प्रक्रियेकरीता प्राप्त होणा-या अर्जापैकी कोणतेही कारण न देता विशिष्ट अर्ज किंवा सर्व अर्ज रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत.

| अ.क्र. | विहित नमुन्यात अर्ज | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| 1 | जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज पाठविण्याचा अंतिम दिनांक | 13.04.2023 |
| 2 | जिल्हाधिकारी कार्यालयाने अर्जांची प्राथमिक छाननी करण्याचा दिनांक | 17.04.2023 |
| 3 | जिल्हाधिकारी यांनी उमेदवारांची यादी शासनाकडे सादर करण्याचा अंतिम दिनांक | 20.04.2023 |

(चिन्मय गोतमारे)
जिल्हाधिकारी, गोंदिया

Anuj\DATA\LETTER\MGNREGA Letter.docx

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत तक्रार निवारण प्राधिकारी (कंत्राटी) पदासाठी आवेदन अर्ज

1. अर्जदाराचे नाव :- ----------------------------------------------------------------------

2. कायमचा पत्ता :- ----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

3. दुरध्वनी क्रमांक :- भ्रम्रणध्वनी क्र.

4. ई-मेल पत्ता :-

5. सध्याचा पत्ता :- ----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

6. जन्म तारीख :-

7. लिंग :-

8. शैक्षणिक माहिती :-

| परीक्षा | वर्ष | विषय | शाळा / कॉलेजचे नाव | बोर्ड / विद्यापीठ | टक्के |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

9. इतर शैक्षणिक माहिती (संगणक इत्यादी)

| कोर्स | वर्ष | विषय | संस्थेचे (प्रायोजक) नाव | टक्के |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

10. अनुभव

| अ.क्र. | हुद्दा व वेतन | संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचे वर्णन |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

मला पुर्णपणे माहित आहे की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंमलबजावणीकरीता कंत्राटी पध्दतीने, एकत्रित मासिक मानधन तत्वावर तक्रार निवारण प्राधिकारी (कंत्राटी) या पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पदे निव्वळ तात्पुरती स्वरुपाची असुन शासन निर्णयाप्रमाणे योजनेच्या व्याप्तीप्रमाणे कमी / अधिक करण्यात येतील. सदर नियुक्ती ही कंत्राटी स्वरुपाची असुन या सेवे आधारे मला कोणत्याही शासकीय सेवेसाठी दावा करता येणार नाही. तसेच शासकीय सेवेचे काणतेही लाभ मला प्राप्त होणार नाहीत.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझे माहितीप्रमाणे वर दिलेला तपशील सत्य व अचुक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी रद्द होईल तसेच मी शिक्षेस / दंडास पात्र ठरेन याची मला पुर्णपणे जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची सही